# जनसंपर्क विभाग

जळगाव दि. २ (प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालये / परिसंस्था व प्रशाळा यामध्ये शैक्षणिक वर्ष २०२३-२४ करीता प्रवेश घेण्यासाठी १० ऑगस्ट, २०२३ पर्यंत मुदत वाढवून देण्यात आली आहे.

या शैक्षणिक वर्षात प्रवेश देण्याचा कालावधी ३१ जुलै पर्यंत देण्यात आला होता. मात्र अनेक विद्यार्थ्यांचे प्रवेश घेण्याचे राहून गेल्यामुळे त्यांनी महाविद्यालयांमध्ये जावून प्रवेशासाठी प्राचार्यांकडे विनंती केली. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हित लक्षात घेवून प्रवेशासाठी आता १० ऑगस्ट, २०२३ पर्यं मुदत वाढवून देण्यात आली आहे. तरी विद्यार्थ्यांनी प्रवेश घ्यावा असे आवाहन विद्यापीठाच्या वतीने करण्यात आले आहे.

**बातमी नं. २**

जळगाव दि. २ (प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या केंद्रीय प्रशिक्षण व नियुक्ती कक्षा मार्फत जे.एस. डब्ल्यू पेंटस् प्रा. लि. वासिंद, जि. ठाणे या कंपनीसाठी घेण्यात आलेल्या मुलाखतीमध्ये दोन विद्यार्थ्यांची निवड झाली असून त्यांना साडेपाच लाख रूपयांचे वार्षिक वेतन देण्यात येणार आहे.

बी.टेक. (पेंट टेक्नॉलॉजी) च्या विद्यार्थ्यांच्या ऑनलाईन मुलाखती घेण्यात आल्या. कंपनीतर्फे वरीष्ठ व्यवस्थापक तुषार ठाकरे, उपाध्यक्ष संदीप कोकणी, प्लान्ट अधिकारी सुमित कराड व उदय देशमाने यांनी मुलाखती घेतल्या. यामध्ये मानस सपकाळे व श्रुतिका टोंगसे या दोघांची निवड झाली. मुलाखतींचे व्यवस्थापन कक्षाचे उपसमन्वयक डॉ. उज्ज्वल पाटील, पेट टेक्नॉलॉजी विभागप्रमुख डॉ. रवींद्र पुरी यांनी केले. या विद्यार्थ्यांचे कुलगुरू प्रा.व्ही.एल. माहेश्वरी, प्र-कुलगुरू प्रा.एस.टी. इंगळे, कुलसचिव डॉ. विनोद पाटील, यु.आय.सी.टी.चे संचालक प्रा. जे.बी. नाईक, प्लेसमेंट समन्वयक प्रा. रमेश सरदार यांनी अभिनंदन केले.

---

जा.क्र.: कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२३ दिनांक: २ ऑगस्ट , २०२३

प्रति,
मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी